# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## पुनर्विलोकन अर्ज क्र. ५ / २०२१

(मुळ अभिवेदन क्रं. १८/२०२१ च्या आदेशाबाबत)

## नवीन कृषीपंप वीज जोडणीबाबत

विश्वनाथ परशुराम सकपाळ.................................................................................................अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण).................................................. प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- आनंद शिवराम ओक

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, महावितरण, चिपळूण

**कोरम :- दिपक लाड**

सुनावणी दिनांक :- २६ ऑगष्ट २०२१

आदेश पारित दिनांक :- ९ सप्टेंबर २०२१

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम २२ नुसार विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक १० मे २०२१ रोजीच्या पारीत आदेशांविरूध्द अभिवेदन क्रं. १८/२०२१ बाबत पुनर्विलोकनासाठी अपिलार्थीने दिनांक १ जुलै २०२१ रोजी अर्ज सादर केला.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२.	विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या अभिवेदन क्रं. १८ / २०२१ मधील दिनांक १० मे २०२१ च्या आदेशान्वये सदर प्रकरण ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर यांच्याकडे नव्याने सुनावणी करण्याकरीता पाठविण्यात येत आहे. मंचाने या प्रकरणाची सुनावणी घेऊन लवकरात लवकर योग्य ते आदेश पारित करावेत असे निर्देश दिलेत.

३	अपिलार्थीने आपल्या पुनर्विलोकन अर्जात उपस्थित केलेले मुद्द संक्षिप्तपणे खाली नमुद केले आहेत.

- विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या अभिवेदन क्रं.१८/२०२१ मधील दिनांक १० मे २०२१ च्या आदेशाने समाधान न झाल्याने सदर पुनर्विलोकनाचा अर्ज सादर केला आहे.

- अपिलार्थीने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) यांचे दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ चे केस क्र.६/२०१९ च्या आदेशातील भरपाईबाबतची twice the service connection charges अशी निर्धारीत केलेली मर्यादा ही केवळ वीज जोडणी देण्यात झालेल्या विलंबाबाबतच्या भरपाई बाबतच म्हणजेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०१४ (कृती मानके विनियम २०१४) मधील विनियम ४.७,४.८ आणि ४.९ बाबतीत असल्याचे आयोगाच्या दिनांक २० मे २०१९ च्या क्लरीफिकेशन आदेश क्र.१०२/२०१९ मध्ये स्पष्ट केले आहे. तसेच Except for these changes, the compensation amount for other activities / event payable as per SOP Regulations shall remain unaltered असा स्पष्ट खुलासाही केलेला आहे.

- विनियम ४.३ नुसार जागेची पाहणी करणे आणि विनियम ४.५ नुसार कोटेशन देणे याबाबत झालेल्या विलंबाबाबतची भरपाई व अन्य न्यायोचीत असलेल्या रक्कमा कृपया मंजूर केल्या जाणेबाबत नम्र विनंती आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- वीज जोडणी मागणीच्या अर्जाच्या प्रतीवरील असलेल्या अन्य मार्कींग वरून सदरची प्रत दिनांक ९ मार्च २०२१ रोजी सादर केलेल्या अपिलार्थींच्या अर्जासोबतच्या दिनांक ३१ जानेवारी २०१३ च्या अर्जाचीच अपिलार्थींने प्रमाणीत केलेली प्रत असल्याचे निदर्शनास आले. यावरून अपिलार्थीचा वीज जोडणी मागणीचा अर्ज हा दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजीचा असल्याचे स्पष्ट होते. तरीसुद्धा प्रतिवादींनी सादर केलेल्या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन न झाल्याने अपिलार्थींच्या अर्जाच्या तारखेबाबत विनाकारण प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले याकडे आदेशात दुर्लक्ष झालेले आहे. दिनांक ३१ जानेवारी २०१३ च्या नवीन कृषी वीज जोडणी मागणीच्या अर्जाची प्रत सादर करून अपिलार्थींच्या अर्जाच्या खरेपणाबाबतचा ठोस पुरावा दिलेला आहे. त्या आधारे अपिलार्थीचा तक्रार अर्ज निकाली काढला जाणे न्यायोचीत असल्याने कृपया त्याच्या आधारे अपिल अर्जाचा न्याय निर्णय केला जावा ही नम्र विनंती.

- अर्ज प्राप्त झाल्याची प्रतिवादीने नमुद केलेली दिनांक १२ एप्रिल २०१७ ही तारीख खोडसाळपणे नमुद केलेली आहे. अर्जाच्या तारखेचा, विनियम ४ व त्याच्या उपकलमाशी संबध असल्याने ती अर्जाप्रमाणे नोंदल्यास संबधीत कलमान्वये दिल्या जाणाऱ्या भरपाईच्या रकमेत वाढ होण्याचो धास्ती असल्यानेच, संगणकास अर्जदाराची माहिती भरताना अर्जाच्या तारखे बाबतचा जाणिवपूर्वक फेरबदल प्रतिवादीकडुन केला जातो. अश्याप्रकारे खोडसाळपणे खोटया तारखा नमुद करणे ह प्रतिवादी जाणूनबुजून करत असल्याने दिनांक १२ एप्रिल २०१७ या खोटया तारखेबद्दल आश्चर्य वाटण्याचे कांहीही कारण नाही व त्याबाबतचा कोणताही खुलासा प्रतिवादींनी केला नाही.

- सदर निकालपत्रात ठेकेदार कामासाठी गेले असता जमीन मालकानी हरकत घेतल्याने हे प्रतिवादीचे कारण बेदखल करण्याच्या पात्रतेचे आहे. मंचाचा आदेशानंतरच प्रतिवादीने कामाची सुरवात केली आहे. यावरून अपिलार्थीचा अर्ज मिळाल्यापासून म्हणजे दिनांक ३१ जानेवारी २०१३ पासुन ते मंचाचा आदेश दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या ७ वर्षाच्या कालावधीत त्यांनी जोडणी देण्याच्या दृष्टीने काहीही कामकाज केलेले नव्हते हे स्पष्ट होते यावरून मा. आयोगाचे विनियमाचे पालन केले गेले नाही हे सिध्द होते. वीज परवठा बाबतीत वाहिनीचे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

काम करताना जमीन मालकान घेतलेल्या हरकतीचे निवारण करून देण्याची जबाबदारी अपिलार्थी ग्राहकाची असल्याबाबतची कोणतीही तरतूद वीज कायदयात नाही.

- सर्व्हिस पॉईंट पर्यंत वीज वाहीनी आणून देण्याची व त्या मार्गात येणाऱ्या अडचणीचे निवारण करण्याची कायदेशीर जबाबदारी सपर्णतः प्रतिवादी यांची आहे. तथापि, हरकतीबाबतच्या पक्रियेनूसार प्रथम एफआयआर नोंदविणे, जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरण सादर करणे, ही कार्यपध्दती प्रतिवादीने अवलंबलेली नाही.

- आपल्या आदेशातील मुद्दा ७ (ई) खालील प्रमाणे आहे.

*"ई) अपिलार्थीने दिनांक १० मार्च २०१३ रोजी नुकसान भरपाईकरीता अर्ज सुध्दा केला. मात्र त्यानंतर कोटेशनच्या रक्कमेचा भरणा केलेल्या तारखेपर्यंत कोणताही पाठपुरावा केल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही. सबब, अर्ज २०१३ या वर्षात केला की, खरोखर २०१७ या वर्षात केला याबाबतचे चित्र स्पष्ट होत नाही. कारण अर्ज केल्याबरोबर लगेच दिनांक १० मार्च २०१३ रोजी नुकसान भरपाईकरीता अर्ज करणे व मंच व कक्ष याकडे कोणताही अर्ज न करणे हे अनाकलनीय आहे."*

- त्याबाबतचा खुलासा असा आहे की, दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी हमदस्त वितरणाने अर्ज सादर करताना वीज जोडणी केव्हा मिळेल, अशी विचारणा केली असता, पुढील ३ ते ४ महिन्यात मिळेल असे सांगण्यात आले, परंतू त्यावर कोणतीही कार्यवाही नाही म्हणून पाठपूरावा केला असता तीच तीच उत्तरे मिळाली. वीज जोडणी नियमानुसार वेळेत मिळत नाही म्हणून नुकसान भरपाईचे पत्र दिले असता त्याचीही पोहोच दिली नाही वा वीज जोडणीही दिली नाही. अखेर हताश होऊन वाट बघण्याशिवाय पर्याय नव्हता वा यावर काहीही उपाययोजना करू शकलो नाही.

- योगायोगाने महावितरणबाबत साधारण थोडीफार माहिती असलेल्या व्यक्तिची दवाखान्यात भेट झाली असता व या विषयाबाबत चर्चा झाली असता, त्यांच्या सल्ल्यानुसार भरपाईची मागणी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

करणारे पत्र पाठविले, न जाणो, कदाचीत त्यास घाबरून वीज जोडणी मिळेल व अपिलार्थीचे काम सुध्दा होईल असे वाटले.

- यावर आता पुढे काय करावे याबाबत अपिलार्थीना काहीही सुचत नव्हते, काही मार्गही सापडत नव्हता. परिणामी, अपिलार्थीना मुग गिळून गप्प बसण्याखेरीज व महावितरणच्या कारभारावर केवळ नाराजी व्यक्त करण्याशिवाय अपिलार्थी काहीही उपाययोजना करू शकले नाही ही वस्तूस्तिती आहे. अशीच साधारण चार वर्षे केवळ वाट बघण्यात निघून गेली.
- दिनांक २० सप्टेंबर २०१७ असलेले कोटेशन डिसेंबर २०१७ मध्ये (३ महिने उशीरा) देण्यात आले. कोटेशन भरल्यानंतरही वीज जोडणी देण्याबाबत काहोही हालचाल झाली नाही, म्हणून त्याचा पाठपूरावा केला असता प्रतिक्षा यादीचे कारण सांगण्यात आले.

- वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीने आपल्या पुनर्विलोकन अर्जात खालीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

  - पुनर्विलोकनाचा विनंती अर्ज मंजूर व्हावा.
  - विनियम ४.३ नुसार जागेची पाहणी केली जाणे बाबतची मुळ अपिल अर्जात नमुद केलेली रक्कम रू.१३000/- भरपाई दिली जाण्याबाबतचा आदेश पारीत व्हावा.
  - विनियम ४.५ नुसार दिनांक १२.0८.२0२0 पर्यत कोटेशन देण्याबाबतीत झालेल्या विलंबाबाबत मुळ अपिल अर्जात नमूद केलेली रक्कम रू.१२,९00/- मंजूर केले जाऊन तसा आदेश व्हावा.
  - विनियम ४.८ नुसार वीज जोडणी देण्यात विलंब झालेला असल्याने रू.२,१९८/- एवढया फरकाची रक्कम मंजूर केली जाऊन तसा आदेश व्हावा.
  - माननीय कक्षाकडील, माननीय मंचाकडील आणि मा. विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालय या अशा तीन अर्जाचा एकूण झालेला किमान सर्व खर्च रू.१000/- अगर माननीय अध्यक्ष महोदयास योग्य वाटणारी रक्कम दिली जाण्याचा आदेश व्हावा.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- निर्भळ न्यायदानास मदत करील असा दस्तावेज ऐनवेळी सादर करणे अतीव गरजेचे भासल्यास त्याबाबतीत तसेच आवश्यकतेनुसार अपिल अर्जातील मजकूर कमी अधिक करण्यासाठी अनूमती असावी ही नम्र विनंती.
- इतर न्यायोचित आदेश व्हावेत.

४. प्रतिवादी यांनी दिनांक १३ ऑगष्ट २०२१ रोजी सादर केलेल्या उत्तरातील प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलकर्ते श्री विश्वनाथ परशुराम सकपाळ यांनी चिपळूण ग्रामीण उपविभागात नवीन शेतीपंप जोडणीसाठी अर्ज केला होता.
- सदर अर्जाबाबत पाहणी करून उच्चदाब वितरण प्रणाली मधून अंदाजपत्रक तयार करण्यात आले व ते EE/CPL/T/AG Backlog/2017-18/ghr/01/Dt.13.06.2017 नुसार मंजूर करण्यात आले व आवश्यक असणारे कोटेशन देण्यात आले.

- त्यानंतर शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग सौरप्र २०१८/प्र.क्र.४०१/उर्जा-१/दि.१५.११.२०१८ व पत्र क्र.CE(Dist)/Solar/No.2472/dt.24.01.2019 नुसार कृषीपंप वीज जोडणी अर्जदारांना पारंपारिक वीज जोडणी ऐवजी सोलर कृषीपंप देण्याचे धोरण निश्चित झाले. त्यानुसार अर्जदारास पत्र क्र.उपकाअ/गुहा/ता/५६२/दि.०५.०३.२०१९ नुसार ऑनलाईन अर्ज करण्यासाठी कळविण्यात आले. परंतू अर्जदारानी ऑनलाईन अर्ज केला नसल्यामुळे कोणतीही कार्यवाही करता आली नाही.

- त्यानंतर अपिलार्थींने दिनांक १८ सप्टेंबर २०१९ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली मंचाने दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या आदेशाने अपिलार्थी यांना सर्व्हीस कनेक्शन चार्जेसच्या दुप्पट नुकसान भरपाई देण्यात यावी असा आदेश देण्यात आला. मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी रु.९२/- चा धनादेश नुकसान भरपाई म्हणून देण्यात आला.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- अपिलार्थी यांच्या अभिवेदनात वीज जोडणीच्या विलंबाबाबत उल्लेख आहे, मात्र अपिलार्थी यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी महावितरणच्या मुख्यालयाच्या निर्देशानुसार सदर अर्जास मंजूरी देऊन त्याचा जेष्ठता यादीत समावेश करण्यात आला होता. तसेच मार्च २०१८ नंतरच्या सर्व कृषीपंप ग्राहकांना सौर उर्जेवर चालणाऱ्या पंपाकरीता वीज जोडणी देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाला होता. अपिलार्थी यांना महावितरणच्या नियमाप्रमाणे लवकरात लवकर कृषी वीज जोडणी दण्यात यावी असा निर्णय कक्षाने दिला, परंतू महावितरणच्या चिपळूण उपविभागातर्फे प्रलंबित जेष्ठता यादी नुसार कार्यवाही सुरू होती.

- मंचाने अपिलार्थी यांना आदेशाच्या दिनांकापासुन तीन महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात यावी असा आदेश दिला. मचाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना वोज जोडणी दिलेली असून मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे. अपिलार्थी यांचे वीज जोडणीबाबत प्रतिवादी महावितरणकडुन कोणताही जाणीवपुर्वक उशीर झालेला नाही. मंचाच्या आदेशानूसार अपिलार्थी यांना दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी रू.९२/- चा धनादेश नुकसानभरपाई म्हणून देण्यात आला.

- अपिलार्थी यांनी सादर केलेल्या पुनर्विलोकन अर्जात कोणताही नवीन मुद्दा उपस्थित केलेला नाही.

- वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीचा पुनर्विलोकन अर्ज अमान्य करण्यात यावा.

५. कोविड-१९ मुळे सदर पुनर्विलोकन अभिवेदनाची ई-सुनावणी दिनांक २६ ऑगष्ट २०२१ रोजी दोन्ही पक्षकारांच्या संमतीने ऑडीओ कॉन्फरसिंगद्वारे घेण्यात आली कारण व्हिडीओ कॉन्फरंस मध्ये तांत्रिक अडचणी आल्यात. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षकारांनी आपापल्या मुद्दांबाबत युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. प्रतिवादी यांनी असे नमुद केले की, चिपळूण भागात खुप मोठया प्रमाणात पर्जन्यवृष्टी होऊन वीज वितरण व्यवस्थासुध्दा मोठया प्रमाणात

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

खंडीत झाली व सर्व कामे विस्कळीत झालीत, सबब, या पुनर्विलोकन अर्जामध्ये त्यांचे निवेदन सादर करण्यास उशीर झाला याबाबत प्रतिवादीची बाजू समजून घ्यावी हो विनंती.

**विश्लेषण व निर्णय.**

६. दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकुन घेण्यात आली व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. या पुनर्विलोकन अर्जात अपिलार्थी यांनी विद्युत लोकपाल (मुंबई) यांनी अभिवेदन क्र.१८/२०२१ मधील दिनांक १० मे २०२१ च्या आदेशाचे पूर्ण अवलोकन केल्याचे दिसत नाही, कारण सदरच्या आदेशान्वय कोल्हापूर मंच यांना या प्रकरणात पुनश्चः नव्याने सुनावणी (De Novo) घेण्याकरीता पाठविण्यात आले आहे. त्यामुळे या ठिकाणी पुनर्विलोकन अर्ज विचारात घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सबब, सदर पुनर्विलोकन अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai